## <u>निशाणी क्र. १७१ वरील आदेश</u>

प्रतिवादी क्र.२ हिने प्रस्तुतचा अर्ज देवगड पोलीस ठाणे गु.र.क्र. १०/२०११ चे कामी दि.०६/१२/२०१० इ. रोजीचे अस्सल मुखत्यारपत्र व त्यावरील हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल न्यायालयात हजर करणेसाठी पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे देवगड यांना समन्स काढणेसाठी दाखल केला आहे. तिच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरूध्द् दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. तिने याकामी कैफियत सादर केली आहे व तिच्या हिश्श्याचे वाटप करून मागितले आहे. या कामी प्रतिवादी क्र.१ मयत असून तो तिचा सख्खा भाऊ होता. प्रतिवादी क्र.३ ही प्रतिवादी क्र.२ ची सख्खी बहीण आहे. यातील प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी संगनमत करून प्रतिवादी क्र.२ हिचे एक खोटे आणि बनावट मुखत्यारपत्र बनवून त्याआधारे दि.०७/१२/२०१० रोजी दावा मिळकतीची दोन वेगवेगळी खरेदीखते प्रतिवादी क्र.१३ च्या नावे केलेली आहेत. सदर खरेदीखतास वापरलेल्या मुखत्यारपत्रावर प्रतिवादी क्र.२ ची खोटी सही केली आहे व खोटया अंगठयाचा ठसा उमटविलेला आहे. दि.०६/१२/२०१० रोजीचे कथित अस्सल मुखत्यारपत्र देवगड पोलिसांनी गु. र. क्र.१०/२०११ चे कामी प्रतिवादी क्र.१३ कडून जप्त केले आहे. सदरचे अस्सल कुलमुखत्यारपत्राचा दस्त या दाव्याचे कामी मागवून घेणे अत्यंत आवश्यक व जरूरीचे आहे. सदर दस्तावरील सहया व अंगठयांची पडताळणी करणेकरिता पोलिसांनी प्रतिवादी क्र.२ कडून नमुना हस्ताक्षर व अंगठयाचे ठसे घेवून ते तपासणीकरिता हस्ताक्षर तज्ञ पुणे यांच्याकडे पाठविलेले आहे. सदर हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल देखील या कामी मागवून घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक व जरूरीचे आहे. सबब, मुखत्यारपत्र व त्यावरील सहया, अंगठयाबाबतचा हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल न्यायालयात हजर करणेसाठी पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे देवगड यांना समन्स काढणेसाठी प्रस्तुत प्रतिवादीने विनंती केली आहे.

२. वादींना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी नि.क्र.१७१ वर म्हणणे दाखल केले नाही. सबब, सदरचा अर्ज त्यांच्या विरूध्द् विना म्हणणे चालविणेत आला आहे.

३. प्रतिवादी क्र.३ हिने नि.क्र.१८० ला म्हणणे दाखल केले आहे. तिच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.१ व ३ यांचेविरूध्द् केलेले संगनमताचे आरोप हे सर्वस्वी खोटे व काल्पनिक आहेत. प्रतिवादी क्र.३ हिने कोणतेही खोटे अथवा बनावट कागदपत्र केलेले नाहीत अथवा खोटया सहया देखील केलेल्या नाहीत त्या संदर्भात खोटी सही अथवा अंगठा केलेला नाही. गु.र.क्र. १०/२०११ चे कामी पोलिसांनी असे कथित कागदपत्र जप्त केले अथवा नाही किंवा जप्त केले असता ते कोणाकडून केले याची प्रतिवादी क्र.३ हीस माहिती नाही. अस्सल कुलमुखत्याराचा लेख तसेच हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल वगैरे कागदपत्र प्रतिवादी क्र.२ हिला याकामी मागविणेची प्रामाणिक इच्छा असती तर संबंधित कागदपत्र तिने याकामी तिचा सरतपास तसेच उलटतपास होणेपूर्वी मागविणे कायदयाने आवश्यक होते. परंतु, योग्य वेळी संबंधित कागदपत्र न्यायालयाचे रेकॉर्डवर न मागविता प्रतिवादी क्र.२ ची जबानी तसेच उलटतपास पूर्ण झालेनंतर सदरील कागदपत्र रेकॉर्डवर आणलेस प्रतिवादी क्र.३ चे वतीने प्रतिवादी क्र.२ ची उलटतपासणी घेणेची संधी प्रतिवादी क्र.३ हिला नाकारले सारखे होवून तिचे बचावाचे पावित्र्यावर अनिष्ट परिणाम होईल व तिचे नुकसान होईल. कोणत्याही कारणे प्रतिवादी क्र.२ चा अर्ज मंजूर करणे झाल्यास प्रतिवादी क्र.२ हिची अशा कागदपत्रांसंबंधात उलटतपासणी घेणेचा प्रतिवादी क्र. ३ हिचा हक्क राखून व तिला तशी मोकळीक ठेवणेत यावी. सबब, या कारणास्तव प्रतिवादी क्र.२ हिने उशिरा दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेची विनंती प्रतिवादी क्र.३ हिने केली आहे.

४. प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रतिवादी क्र.२ हिने प्रतिवादी क्र.१ व ३ यांना मुखत्यारपत्र बनवून दिले, त्यावर प्रतिवादी क्र.२ ने सही केली आहे अगर अंगठयाचा ठसा उमटवला आहे ही बाब प्रतिवादी क्र.२ ने कैफियतीमध्ये स्पष्टपणे नाकारली आहे असे दिसून येते. ज्या मुखत्यार पत्राच्या आधारे प्रतिवादी क्र.१३ च्या नावे दावा मिळकतींची खरेदीखते झाली आहेत त्या मुखत्यारपत्राबाबत वाद असल्याचे दिसून येते. मात्र, हे मुखत्यारपत्र या कामी दाखल नाही असे दिसून येते. या प्रकरणा संदर्भात फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे याबाबत वाद नाही असे दिसून येते. त्यामुळे वर नमूद वाद निवारणाकरिता सदरचे मुखत्यारपत्र व त्याबाबतचा हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल याकामी दाखल होणे आवश्यक व गरजेचे आहे असे मला वाटते.

६. मात्र, सदर मुखत्यारपत्र हे संदर्भीय फौजदारी प्रकरणामध्ये जप्त केले आहे असे प्रस्तुत प्रतिवादीचेच म्हणणे आहे. सदर अस्सल मुखत्यारपत्र हे फौजदारी प्रकरणामध्ये देखील आवश्यक असणार आहे. त्यामुळे त्या प्रकरणातील अस्सल मुखत्यारपत्राची सहीशिक्कयाची प्रत काढून घेवून या कामी प्रस्तुत प्रतिवादी दाखल करू शकते. अशा सहीशिक्क्याच्या प्रतीबाबत भारतीय पुरावा अधिनियम कलम ६५ मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव प्रस्तुत प्रतिवादी दुय्यम पुरावा सादर करू शकते. त्यामुळे सदर फौजदारी प्रकरणातील जप्त केलेले अस्सल मुखत्यारपत्र या कामी दाखल करणेकरिता समन्स काढणेची गरज नाही असे मला वाटते.

७. सदर मुखत्यारपत्रावरील सहया व अंगठयाचे ठसे प्रतिवादी क्र.२ चे नाहीत असे तिचे कथन आहे. त्यामुळे त्याबाबतचा हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल या कामी सादर करणेस समन्स काढणे न्यायोचित वाटते. सबब, हस्ताक्षर तज्ञांच्या अहवाल या कामी हजर करणेबाबत संबंधित पोलीस अधिकारी यांना समन्स काढणेची विनंती मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सदर

कागदपत्र दाखल झाल्यास प्रतिवादी क्र.३ चे कोणतेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. किंबहुना प्रस्तुत वाद निवारण होण्यास या कागदपत्राची मदतच होणार आहे.

८. मात्र, या कागदपत्राबाबत प्रतिवादी क्र.३ हीस प्रतिवादी क्र.२ चा उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. सबब, सदर कागदपत्र दाखल झाल्यानंतर त्याबाबत प्रतिवादी क्र.२ चा उलटतपास प्रतिवादी क्र.३ ने घेण्याचा अधिकार राखून ठेवणे योग्य वाटते.

९. सबब, वरील सर्व कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## – **आदेश** –

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे देवगड यांनी गु.र.क्र.१०/२०११ मध्ये जप्त केलेल्या दि.०६/१२/२०१० इ. रोजीच्या कुलमुखत्यार पत्राबाबतचा हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल दोन प्रतीत त्वरित मागवून घेवून त्यापैकी एक प्रत या कामी दाखल करावी असे समन्स काढण्यात यावे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–
( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

स्थळ : देवगड
दिनांक : २५/०७/२०१८